A-PDF Merger DEMO : Purchase from www.A-PDF.com to remove the watermark

# PUNE MUNICIPAL CORPORATION

## PUBLIC NOTICE

(Issued U/s 37(1) of the Maharashtra Regional & Town Planning Act 1966)
(No. :- Date:- )

Whereas, Government of Maharashtra has issued directive under section 37(1) along with section 154 of M. R. & T. P. Act. 1966 to impose restriction on redevelopment of sites of existing filling & service station of petrol, diesel, gas etc. vide letter no. TPB-4308/211/प्र.क्र.87/2009/U D-11, Dated 03.12.2009

And whereas General Body of PMC vide its resolution no. 139 dtd. 23.08.2010 granted permission to issue Public notification for the said modification. Pune Municipal Corporation intends to suggest the following minor modification in development Control Rules of the sanctioned Development plan of Pune City.

D.C. Rule No. 13.4.3.5

"Provided that in the redevelopment of sites of existing filling & service station of Petrol, Diesel, Compressed Natural Gas or any other Motor Vehicle Fuel, Change of user shall not be permitted.

Restriction on redevelopment of these sites in municipal corporation area shall be applicable on plot area less than 5000 sq. ft. Whereas, Along with existing use, uses previously permissible shall be permitted for plot area above 5000 sq. ft."

And for that purpose PMC invites suggestion and objections from any person with respect to the said modification. Suggestions or objections shall be submitted to the Office of the City Engineer, Pune Municipal Corporation, PMC Building, Shivajinagar, Pune 5. Suggestions/objections received within the period of 30 (Thirty) days from the date of publication of this notice will only be considered. Persons affected due to this modification, will be heard by the City Engineer, Pune Municipal Corporation during office hour, if requested.

(Mr. Mahesh Zagade)
Municipal Commissioner
Pune Municipal Corporation

# पुणे महानगरपालिका

## जाहीर प्रकटन

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१))

(क्रमांक :- दिनांक :- )

शासन आदेश क्र. टीपीबी/४३०८/२११/प्र.क्र.८७/२००९/नवि-११, दि.०३.१२.०९ अन्वये मा. अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वातील पेट्रोल, डिझेल, सीएनजी इ. पंपाच्या विद्यमान वापर बदलाबाबत तरतूद महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) सह १५४ अन्वये निदेश दिले होते.

त्यास अनुसरुन मा. मुख्य सभा ठराव क्र. १३९, दि.२३.०८.१० अनुसार गौण फेरफाराच्या कार्यवाहीस व जाहिर प्रकटन प्रसिद्ध करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिका क्षेत्रातील जागेवरील विद्यमान पेट्रोल/डीझेल/सीएनजी इ. बंद करुन तिथे विद्यमान वापराव्यतिरिक्त इतर वापर करण्याबाबत निर्बंध आणणे या करिता विकास आराखड्यामध्ये खालील तरतूद समाविष्ट करण्याचा पुणे महानगरपालिका विचार करीत आहे.

विकास नियंत्रण नियमावली क्र. १३.४.३.५

विद्यमान पेट्रोल पंप, डिझेल, सी. एन. जी. (Compressed natural gas) किंवा इतर वाहन इंधनाचे पंप असलेल्या मिळकतीचा पुनर्विकास करताना विद्यमान जमीन वापराव्यतिरिक्त इतर जमिन वापर अनुज्ञेय होणार नाही.

तथापि महापालिका क्षेत्रातील जागेवरील ५००० चौ. फुट पेक्षा कमी क्षेत्र असलेल्या मिळकतीवर शासन निर्णयानुसार निर्बंध घालण्यात यावेत व ५००० चौ. फुट क्षेत्रा पेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या मिळकतीवर मूळ वापराबरोबर पूर्वी प्रमाणे वापर अनुज्ञेय करावे.''

त्यास अनुसरुन पुणे महानगरपालिका सदर बदलाबाबत नागरिकांकडुन हरकती व सुचना मागवित आहे. नागरिकांनी त्यांच्या हरकती व सुचना नगर अभियंता कार्यालय, मनपा भवन, शिवाजीनगर, पुणे५ येथे लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासुन ३० (तीस) दिवसांच्या आत प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांचाच विचार केला जाईल. त्याचप्रमाणे सुचविलेल्या बदलामुळे बाधीत होणाऱ्या नागरीकांनी विनंती केल्यास त्यांचे म्हणणे मा. नगर अभियंता, पुणे महानगरपालिका हे कार्यालयीन भेटीचे वेळी ऐकून घेतील.

(श्री. महेश झगडे)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका